दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
• वर्ष १६ वे • अंक १४७ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शनिवार दि.२१ ऑगस्ट २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

देवदेवतांचे दागिने चोरी करणारी टोळी गजाआड

नवी मुंबई गुन्हे शाखेच्या मध्यवर्ती कक्षाची कारवाई

दै.रायगड नगरी । पनवेल

नवी मुंबई, पालघर येथील मंदिरांतील मूर्ती, देवाचे चांदिचे मुकुट, पादुका, दानपेटीतील रोख रक्कम चोरी करणारे तसेच पार्क केलेल्या मोटार वाहनांच्या बॅटरी चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगारांच्या टोळीला नवी मुंबई गुन्हे शाखेच्या मध्यवर्ती कक्षाकडून अटक करण्यात आली आहे. पोलिसांना चार जणांना अटक केली असून त्यांच्याकडून २ किलो ३५० ग्रॅम चांदी आणि २४ बॅटऱ्या हस्तगत केल्या आहेत.

नवी मुंबई परिसरातील मंदिरामधील देवाचे दागिने, वस्तू तसेच दानपेटी फोडून त्यातील रोख रक्कम चोरीला जात असल्याचे गुन्हे घडत होते. त्यामुळे पोलीस आयुक्त बिपीन कुमार सिंग आणि अप्पर पोलीस आयुक्त डॉ. बी.जी. शेखर पाटील यांनी असे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत सूचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त प्रविणकुमार पाटील आणि सहाय्यक पोलीस आयुक्त विनोद चव्हाण यांनी विशेष मोहीम राबवून सदरचे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत आदेश दिले.

त्यानुसार मध्यवर्ती कक्ष गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक एन.बी. कोल्हटकर यांच्या मार्गदर्शनाखाली समांतर तपास चालू असताना, मध्यवर्ती कक्षाचे सपोनि राजेश गज्ञल व पोलीस शिपाई राहुल वाघ यांना मंदिरांमध्ये चोरी करणारे सराईत आरोपी येणार असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली.

मिळालेल्या माहितीनुसार नेरुळ परिसरात सापळा लावून सुभाष शितलाप्रसाद केवट, मगबुल जोमू शेख उर्फ चिरा, राजू मारुती वंजारे आणि दागिने वितळून देणारा आसित कालीपदो दास याला शिताफीने अटक केली. एकूण ३,२५,०० रुपये किंमतीचा मुद्देमाल आरोपींकडून हस्तगत करण्यात आला. सदरची कामगिरी मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक एन.बी.कोल्हटकर, सहा. पोलीस निरीक्षक राजेश गज्ञल, ज्ञानेश्वर भेदोडकर, जी.डी. देवडे, व पोलीस अमलदार नितीन जगताप, सतीश सरफरे, आतिष कदम, लक्ष्मण कोपरकर, अजय कदम, राहुल वाघ, व विजय खरटमोल यांनी पार पाडली.

संक्षिप्त...

चोवीस तासांत राज्यात ६,३८४ रुग्ण कोरोनामुक्त

दै.रायगड नगरी । मुंबई

राज्यात दररोज कोरोनाचे नवे रुग्ण अद्यापही सापडत असले तरी कोरोनामुक्त होणाऱ्या रुग्णांचीही संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. गेल्या चोवीस तासांत राज्यात कोरोनाबाधितांपेक्षा कोरोनामुक्त रुग्णांची संख्या अधिक असल्याची नोंद करण्यात आली. गेल्या चोवीस तासांत राज्यात तब्बल ६ हजारांपेक्षा अधिक रूग्णांनी कोरोनावर मात केली, तर ४ हजारांपेक्षा अधिक कोरोनाबाधित रुग्णांची नोंद करण्यात आली.

गेल्या चोवीस तासांत राज्यात ६,३८४ रुग्णांनी कोरोनावर मात केली. तर दुसरीकडे ४,३६५ नव्या कोरोनाबाधितांची नोंद करण्यात आली. गेल्या चोवीस तासांत राज्यात १०५ रूग्णांचा कोरोनामुळे मृत्यू झाला. राज्यातील रुग्ण बरे होण्याचा दर ९६.९७ टक्क्यांवर पोहोचला आहे.

उरण तालुक्याला खासगी कंटेनर गोदामे व अन्य भरावांचा विळखा

मातीच्या भरावामुळे अनेक गावांना पुराचा फटका

दै.रायगड नगरी । उरण

उरण तालुक्यात जेएनपीटी बंदरातील आयात - निर्यातीच्या अनुषंगाने जेएनपीटीच्या निर्मिती पासून मागील ३२ वर्षांत विविध प्रकारचे खाजगी कंटेनर गोदामे साकारण्यात आली. या ही गोदामे साकारण्यासाठी तालुक्यातील ठिकठिकाणी मोठ्या मातीचे भराव करण्यात आले.या भरावांसाठी लागणारी माती सर्रास जासई, जांभूळपाडा, दिघोडे, विंधणे, चिरनेर, कंळबसरे, वशेणी, पिरकोन, सारडे, आवरे व अन्य उरण पूर्व विभागातील गाव परिसरातील डोंगरातून पोकलन यंत्राच्या साहाय्याने काढून नेल्याने त्यामध्ये अनेक प्रकारची औषधी वनस्पती उध्वस्त करण्यात आली.या शिवाय आजतागायत वाढत्या गोदामांच्या भरावासाठी नियमित मातीचे उत्खनन करण्यात येऊन भरावाची कामे सुरूच आहेत.

मातीच्या भरावांमुळे होणाऱ्या परिस्थितीला नियंत्रणात आणण्यासाठी शासन स्तरावर योग्य ती पाहणी करून पूरपरिस्थितीला कारणीभूत ठरणाऱ्या कंटेनर गोदाम आणि इतर कामासाठी भराव करणाऱ्यांवर कठोर कारवाईची मोहीम हाती घेण्यात यावी अशी मागणी सामान्य नागरिकांकडून करण्यात येत आहे.

त्याच प्रमाणे सध्या याच उरण तालुक्यातील पूर्व विभागात विविध ठिकाणी तथाकथित विकासकांकडून सीआरझेड कायद्याचे उल्लंघन करून खाडीकिनारी असलेल्या खारफुटीच्या वृक्षांची बेसुमार कत्तल करून सदरची खारफुटीची उध्वस्त करण्यात येत असलेली वृक्षे महसूल खात्याला धूळ चारून, रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत पोकलन यंत्राने डंपरमध्ये भरून दूरच्या ठिकाणी पार्सल

◄ .../४

जिल्हाधिकारी निधी चौधरी यांची बदली

डॉ.महेंद्र कल्याणकर रायगडचे नवे जिल्हाधिकारी

दै.रायगड नगरी । अलिबाग

रायगडच्या जिल्हाधिकारी निधी चौधरी यांची बदली झाली असून, डॉ.महेंद्र कल्याणकर हे रायगडचे नवे जिल्हाधिकारी आहेत. आज (२० ऑगस्ट) या बदलीचे आदेश जारी करण्यात आले आहेत.

निधी चौधरी या २२ जानेवारी २०२० पासून रायगडच्या जिल्हाधिकारी म्हणून रुजू झाल्या होत्या. दीड वर्षे त्यांनी जिल्ह्यातील प्रशासकीय जबाबदारी सांभाळताना उत्तम काम केले. कोरोना महामारी, निसर्ग, ताउक्ते चक्रीवादळ, अतिवृष्टी, दरड दुर्घटना अशा एकामागोमाग आलेल्या नैसर्गिक संकटांमध्ये निधी चौधरी यांनी अत्यंत जबाबदारीने परिस्थिती हाताळली. त्यांच्या बदलीचे आदेश

आज जारी झाले असून, निधी चौधरी यांची आयटी मुंबईच्या डायरेक्टर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

तर २००७ च्या बॅचचे आयएएस अधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर हे रायगडचे नवीन जिल्हाधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत.

गारभट खिंडीतील उतारावरील झाडे ठरत आहेत धोकादायक

दै.रायगड नगरी । खांब-रोहा

रोहे तालुक्यातील अतिदुर्गम भागातील गारभट खिंडीतील उतारावरील झाडे प्रवासाचे दृष्टीने सध्या धोकादायक ठरत आहेत.

गत वर्षी जून महिन्यातील निसर्ग चक्रीवादळ व त्यातूनच कोसळलेल्या मुसळधार स्वरूपातील पावसामुळे या खिंडीतील जेमतेम मातीचा आधार असलेली काही झाडेही कोसळली.सुदैवाने मुसळधार पाऊस पडत असल्याने कोणीही प्रवासी अथवा प्रवासी वाहन तेथून मार्गक्रमण करीत नसल्याने कोणतीही हानी झाली नाही. तरी देखील अद्याप या खिंडीतील उतारावर काही झाडे कोणत्याही स्थितीत कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी संभाव्य अपघाताचा धोका लक्षात घेता सदरील धोकादायक झाडे तोडण्याची मागणी केली जाऊ लागली आहे.



विठ्ठलवाडी-गारभटचा परिसर जरी तालुक्यातील अतिदुर्गम भागातील असला तरी या परिसरातील गावांची

◄ .../४

जास्तीत जास्त लसीकरण करून घेणे गरजेचे : ना.आदिती तटकरे

दै.रायगड नगरी । श्रीवर्धन

जिल्ह्याच्या पालकमंत्री नाम अदितीताई तटकरे यांच्या हस्ते श्रीवर्धन तालुक्यातील मेघरे ग्रामपंचायत कार्यालयाच्या कामाचे भूमिपूजन व प्राथमिक आरोग्य केंद्र वाळवटी येथे १०२ रुग्णवाहिका लोकार्पण सोहळा संपन्न झाला.

या वेळी बोलताना अदितीताई म्हणाल्या की, कोरोनाचे संकट अजून गेलेले नाही, कोरोना रोगापासून बचाव करण्यासाठी जास्तीतजास्त लसीकरण करून घेणे गरजेचे आहे. कोरोनाच्या काळात आरोग्य यंत्रणेवर जास्तीतजास्त निधी देण्याचे नियोजन असल्याने तसेच तटकरेंचा खासदार निधी देखील गेले २ वर्ष मिळाला नसल्याने खासदार निधीतीतील तसेच इतर विकासकामांना निधी प्राप्त होऊ शकला नसल्याने विकास कामे खोळंबली. मात्र ग्रामस्थांनी ज्या कामांबाबत निवेदने दिली आहेत ती सर्व कामे व प्रलंबित सर्व विकास कामे लवकरच मार्गी लागतील. मेघरे येथील ग्रामपंचात कार्यालयाची जुनी इमारत तशीच ठेवून तिला डागडुजी करून ती इतर लोकोपयोगी

कामात आणावी. नवीन इमारत बांधताना कंत्राटदाराने लोकप्रतिनिधी तसेच ग्रामस्थांना विश्वासात घेऊन विकासकामे करावीत. पुढील कालावधीत निधीची कमतरता भरून काढू आणि सर्व कामे मार्गी लावू असे सांगितले. प्राथमिक आरोग्य केंद्र वाळवटी ला भेट दिली होती त्यावेळेस सर्व पाहणी करून रुग्ण सेवेसाठी चांगली रुग्णवाहिका देणे क्रम प्राप्त असल्याने आज या रुग्णवाहिकेचे लोकार्पण करताना आणि इमारतीच्या दुरुस्ती साठी १५ लाखाचा निधी उपलब्ध केला याचे समाधान असल्याचे सांगितले. या वेळी शासनाच्या आरोग्य विभागाकडून आलेल्या कोरोना महामारीत उत्कृष्ठ सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना ना.अदिती तटकरे यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. रुग्णवाहिका लोकार्पण कार्यक्रमणानंतर वाळवटी येथे बागमांडला जि.प.गणातील विकासकामांचा आढावा घेताना ना.अदिती तटकरे यांनी सांगितले कि कुठलाही निधी लॅप्स होता कामा नये, याची खबरदारी संबंधित शासकीय अधिकाऱ्यांनी वर्गाने घ्यावी.

मी प्रबोधनकार ठाकरेही वाचलं अन् यशवंतराव चव्हाणही

राज ठाकरेंचं शरद पवारांना प्रत्युत्तर

दै.रायगड नगरी । पुणे

महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेनंतरच जातीवादाचा मुद्दा प्रखरतेने समोर आला असं मत मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी एका कार्यक्रमात मांडले होते. त्यानंतर राज्यात गदारोळ माजला. त्यावर अनेक चर्चा घडल्या. राज ठाकरेंच्या या वक्तव्यावरुन राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी देखील टीका केली होती. शरद पवारांच्या या टीकेनंतर आता राज ठाकरेंनी यांनी देखील प्रत्युत्तर दिलं आहे.

राज ठाकरेंना माझा सल्ला आहे की, प्रबोधनकारांचे लिखाण वाचा, प्रबोधनकारांचे लिखाण नक्कीच त्यांना योग्य रस्ता दाखवेल अशी मला खात्री आहे, असं शरद पवार यांनी म्हटलं होतं. यावर आज मी प्रबोधनकार ठाकरेही वाचलं आणि यशवंतराव चव्हाण देखील वाचलं. महाराष्ट्र जातीपातीच्या विचारातून बाहेर येणं गरजेचं आहे, हा वक्तव्यमागचा अर्थ होता, असं राज ठाकरे यांनी सांगितले. तसेच पवारांच्या भेटीला जातो, तेव्हा मराठा म्हणून जात नाही, असंही राज ठाकरे यावेळी म्हणाले. जातीचं वातावरण तयार करण्यात येत आहे, असं देखील राज ठाकरे यांनी म्हटलं आहे. राज ठाकरे आज पुण्याच्या दौऱ्यावर आहे. त्यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

तत्पूर्वी, महाराष्ट्रामध्ये जाती पहिल्यापासून होत्या. प्रत्येकाला आपल्या जातीबद्दल एक

◄ .../४

१२ वर्षांवरील मुलांना मिळणार कोरोनावरील लस

जगातील पहिल्या डीएनएवर आधारित लसीला सरकारची मंजुरी

नवीदिल्ली : वृत्तसंस्था

जगातील पहिल्या आणि भारतात विकसित करण्यात आलेल्या डीएनएवर आधारीत करोना लसीच्या आपत्कालीन वापराला केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे. ड्रग्स कंट्रोलर जनरल ऑफ इंडियाने जायडस कॅडिलाच्या या लसीला आत्पकालीन वापरास मंजुरी दिली आहे. ही लस १२ वर्षांवरील मुलांना देण्यात येईल. यामुळे देशात लवकरच १२ वर्षांवरील मुलांचं लसीकरण सुरू होणार आहे. देशात आतापर्यंत १८ वर्षांवरील नागरिकांना करोनाची लस दिली जात होती.

विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाने ही माहिती दिल्याचं वृत्त एएनआयने शुक्रवारी दिलं. DCGI ने जायडस कॅडिलाच्या डीएनएवर आधारीत जागतील पहिल्या करोना लसीला मंजुरी दिली. ही लस १२ वर्षांवरील मुलांना आणि प्रौढांना दिली जाईल.

जायडस कॅडिलाच्या या लीसचे ३ डोस दिले जातील. भारतात ५० हून अधिक केंद्रांवर या लसीची सर्वात मोठी क्लिनिकल ट्रायल केली गेली. अहमदाबादमधील या औषध कंपनीने १ जुलैला लसीच्या आपत्कालनी मंजुरीसाठी DCGI कडे अर्ज केला होता.

ही लस सुईने नाही तर एका खास इंजेक्टरद्वारे दिली जाते. यामुळे लस घेताना फारशी वेदना होत नाही. तसंच या लसीचे साइड इफेक्टही कमी आहेत, असा दावा कंपनीने केला आहे.

समानतेची पावले

एकीकडे आपल्या शेजारच्या देशातल्या सत्तांतराने तिथल्या साऱ्या स्वातंत्र्योत्सुक महिला भयकंपित झाल्या असताना, भारतात स्त्री-पुरुष समानतेच्या दिशेने काही पावले पडत आहेत. भारतालाही स्वातंत्र्य मिळून ७४ वर्षे पुरी झाली आहेत आणि आजही देशातल्या अर्धनागरी, ग्रामीण भागावर नजर टाकली, तर महिलांची समाजातली स्थिती फारशी समाधानकारक नाही. करोनाकाळात महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यातही बालविवाहांचे प्रमाण अचानक कमालीचे वाढले. करोना निर्बंधांमुळे एरवी होणारा खर्च वाचल्याचे समाधान, हेही त्यामागचे एक कारण आहे. याच महाराष्ट्रात गेली अनेक दशके अत्यंत शूर आणि तडफदार अधिकारी तयार करणाऱ्या खडकवासला येथील 'राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी'ची दारे आता महिलांसाठी उघडणार आहेत. यातली खेदजनक बाब म्हणजे, केंद्र सरकार यासाठी फारसे उत्सुक नसताना, सर्वोच्च न्यायालयाला पुढाकार घेऊन हे पाऊल टाकावे लागले आहे. काही दिवसांपूर्वी लाल किल्ल्यावरून स्वातंत्र्यदिनाचे भाषण करताना, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'देशातल्या सर्व सैनिकी शाळांमध्ये मुलींना प्रवेश' देण्याचा स्वागतार्ह निर्णय जाहीर केला. स्त्री-पुरुष समानतेचा अंगिकार आणि पुरस्कार करताना, सैनिकी शाळा मुलींसाठी खुल्या होणे आवश्यकच होते. मोदी यांच्या घोषणेमुळे तशा त्या झाल्या आहेत; मात्र याचवेळी केंद्र सरकार सर्वोच्च न्यायालयासमोर 'एनडीए'तील मुलींच्या प्रवेशासाठी आलेल्या याचिकेला विरोध करीत होते. लाल किल्ल्यावरून सैनिकी शाळा मुलींसाठी खुल्या करणे आणि त्यांच्याच 'एनडीए' प्रवेशाला विरोध करणे, या भूमिकांमध्ये अंतर्विरोध आहे, हे केंद्र सरकारमधील धुरिणांच्या लक्षात कसे आले नाही? तसे ते येते, तर सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठापुढे वेगळी भूमिका मांडता आली असती. अर्थात, तिन्ही सैन्यदलांमध्ये महिलांची सर्वोच्च पदांवरची वाटचाल सुकर व्हावी, यासाठी मागे सर्वोच्च न्यायालयालाच पुढाकार घ्यावा लागला होता. तेव्हाही, न्यायमूर्तींनी बदलत्या काळाचे भान केंद्र सरकारला करून दिले होते. गेल्या काही वर्षांमध्ये देशातली अनेक उच्च न्यायालये आणि सर्वोच्च न्यायालय सातत्याने महिलांच्या प्रश्नांवर कालसुसंगत व आधुनिक भूमिका घेत आहे. मुंबई उच्च न्यायालयाने नुकतीच एका २२ वर्षांच्या 'आई'ला तिचे मानसिक आरोग्य जपण्यासाठी दिलेली गर्भपाताची परवानगी, हाही असाच एक निकाल होता. असे असूनही, प्रत्यक्ष न्यायसंस्थेत मात्र महिला न्यायाधीश आणि न्यायमूर्तींचे प्रमाण किती तरी कमी आहे. काही काळापूर्वी हा विषय चर्चेला आला, तेव्हा सर्वोच्च न्यायालयासहित साऱ्या न्याययंत्रणेवर टीका करण्यात आली होती. अगदी कनिष्ठस्तर न्यायाधीशांपासून ते सर्वोच्च न्यायालयापर्यंत सर्वत्र महिलांचे प्रमाण कमी आहे. स्वातंत्र्यानंतर सर्वोच्च न्यायालयातही आजवर केवळ आठच महिला न्यायमूर्ती काम करू शकल्या आहेत. महिला सरन्यायाधीश मिळण्याची शक्यता तर आजवर निर्माणच झाली नव्हती. आता मात्र कर्नाटक उच्च न्यायालयातील न्यायमूर्ती व्ही. बी. नागरत्ना यांची सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती म्हणून निवड होत असल्याने, ही शक्यता निर्माण झाली आहे.'एनडीए'च्या प्रवेश परीक्षा मुलींसाठी खुल्या करताना सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने केंद्र सरकारला जे खडे बोल सुनावले आहेत, त्यांची दखल केंद्र, सर्व राज्य सरकारे, निमसरकारी संस्था आणि एकंदरीतच समाजाने गंभीरपणे घ्यायला हवी. न्यायमूर्तींनी हा निकाल देताना म्हटले, की केंद्र सरकार लिंगभेद करीत आहे. असे करण्यामागची सरकारी मनोवृत्ती जुनाट आहे. दर वेळी न्यायालयाने आदेशच द्यायला हवेत का? सैन्यदलांमध्ये महिलांना बरोबरीचे स्थान मिळण्यासाठी सरकारची काही जबाबदारी आहे की नाही? हेच प्रश्न देशातील न्यायसंस्थेसकट सर्वांना विचारावे लागतील. आज जगामध्ये अनेक राष्ट्रांच्या सैन्यदलांमध्ये महिला अधिकारी किंवा सैनिक बरोबरीने काम करतात. शत्रूवर चालून जाणाऱ्या विमानांचे सारथ्यही त्या करतात. हे सगळे भारतातही एव्हाना व्हायला हवे होते; मात्र तसे ते झाले नाही. आता सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने 'एनडीए'ची दारे महिलांसाठी खुली होणार असली, तरी खरा मुद्दा मानसिकता बदलायचा असतो. जर मनाची ठेवणच बदलली नाही, तर राजकीय महिला आरक्षणासारखा अनुभव येतो. ही मानसिकता शिक्षणापासून बदलावी लागते. करोनाकाळातही अभ्यासासाठी मोबाइल फोन देताना मुलींना मागे सारल्याची उदाहरणे आहेत. समाजापुढे समानतेचा आदर्श ठेवायचा असेल, तर केंद्र सरकारने अधिक धडाडी दाखवायला हवी. समानतेची पावले आता आपण स्वतःहून, उमेदीने आणि सर्व क्षेत्रांत टाकायला हवीत. त्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने तिखट शेरे मारून एकसारखे धक्के देण्याची गरज काय?

उरण शहरातील पोस्ट ऑफिस जेएनपीटीमध्ये स्थलांतरित ; नागरिकांचा विरोध

दै.रायगड नगरी । उरण

उरण शहरातील गोरगरीब जनता, कामगार,ज्येष्ठ नागरिक अपंग, महिला, महाविद्यालयीन विद्यार्थी, व्यापारी वर्ग यांच्यासाठी सर्वात जवळ व उत्तम व्यवहारासाठी पोस्ट कार्यालय एक उत्तम माध्यम आहे.मात्र हे पोस्ट कार्यालय उरण शहरातून जेएनपीटी येथे स्थलांतरित झाल्यामुळे उरण शहरातील ज्येष्ठ नागरिक, अपंग, महिला, महाविद्यालय विद्यार्थी,व्यापारी, कामगार वर्गाची खूप मोठ्या प्रमाणात कुचंबणा होत असून या सर्वांना खूप मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. उरण शहरात कोटनाका येथे अनेक वर्षापासून पोस्ट ऑफिस कार्यालय कार्यरत आहे. मात्र पोस्ट ऑफिस ज्या इमारतीमध्ये कार्यरत आहेत ते इमारत जुने असून धोकादायक व मोडकळीस आलेले आहे. त्यामुळे या पोस्ट ऑफिसमध्ये कामाला जाणारा ग्राहक, कामगार, व्यापारी वर्ग, ज्येष्ठ नागरिक, महाविद्यालयातील विद्यार्थी, अपंग महिला यांच्या जीवितेला खूप मोठ्या प्रमाणात धोका निर्माण झाला आहे.जीवितहानी होण्याचीहि शक्यता नाकारता येत नाही.शिवाय पोस्ट ऑफिस मध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या जीवालाही धोका निर्माण झाला होता यामुळे सदर पोस्ट कार्यालय सध्या जेएनपीटी मध्ये स्थलांतरित झाले आहे.

उरण शहरापासून जे.एन.पी.टी पाच ते सहा किलोमीटर वर आहे.जे एन पी टी मध्ये आता उरण शहरातील पोस्ट कार्यालय स्थलांतरित झाल्याने उरण शहराच्या आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांना पोस्टातील दैनंदिन व्यवहारासाठी पाच-सहा किलोमीटर दूर असलेल्या जे एन पी टी मध्ये जावे लागत आहे.उरण शहरातून जे एन पी टी येथे जाण्यास वेळेत रिक्षा, बस, टॅक्सी मिळत नाही. शिवाय वेळही जास्त लागतो.त्यामुळे उरण शहरातील नागरिकांना वेळ पैसा श्रम हे जास्त प्रवास खर्च करावे लागत आहे शिवाय नागरिकांना महत्त्वाची कामे वेळेवर होण्यास विलंब होत आहे.आठवड्यातील पाच दिवसच पोस्ट कार्यालय उघडे राहणार आहे. इतर दिवस ते बंद असणार आहे त्यामुळे नागरिकांचे खूप मोठे हाल होत आहेत.पोस्ट कार्यालयावर, पोस्टाच्या व्यवहारावर नागरिकांचा खूप मोठा विश्वास आहे. भविष्यात पोस्ट ऑफिस मधील व्यवहारात वाढ होणार आहे. बँका, शाळा प्रमाणेच पोस्ट कार्यालय हेही आता अत्यावश्यक सेवा बनली आहे.

तहसील कार्यालय, न्यायालय, पंचायत समिती, उरण पोलीस स्टेशन, सार्वजनिक बांधकाम विभाग आदी शासनाचे महत्त्वाचे विविध शासकीय कार्यालये, निमशासकीय कार्यालय, महामंडळाचे कार्यालय हे उरण शहरांमध्ये असल्याने उरणमधील विविध कंपनीचे कर्मचारी,व्यापारी, कामगार,शासकीय कर्मचारी, महिला,अपंग, ज्येष्ठ नागरिक, महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच विविध सामाजिक संस्थांनी पोस्ट ऑफिस उरण शहरातच नवीन प्रशस्त ठिकाणी सुरू करावे,उरण शहर सोडून दुसऱ्या ठिकाणी पोस्ट कार्यालय हलवू नये अशी मागणी केली आहे.

महाराष्ट्र अंनिस पनवेल शाखेचा निर्भय मॉर्निंग वॉक

अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्यावतीने पनवेलमध्ये निषेध

तहसीलदार विजय तळेकर यांच्याकडे अंनिसने सुपूर्द केले पत्र

दै.रायगड नगरी । पनवेल

डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या निर्घृण खुनाच्या तपासात होणा-या अक्षम्य दिरंगाईबाबत महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने पनवेलमध्ये निषेध नोंदवण्यात आला. २० ऑगस्ट रोजी डॉ. नरेंद्र दाभोळकरांच्या खूनाला आठ वर्षे झाली. तरीही अजून खूनाच्या सुत्रधारांना पकडण्यात आलेले नाही. डॉ. दाभोलकरांच्या खूनाच्या तपासातील दिरंगाईमुळे त्यानंतर कॉ. पानसरे, प्रा. कलबुर्गी, पत्रकार गौरी लंकेश यांच्याही हत्या झाल्या. याचा निषेध करण्यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या पनवेल शाखेतर्फे शुक्रवारी सकाळी निर्भय मॉर्निंग वॉक काढण्यात आला. आठ वर्षानंतरही खूनाच्या सुत्रधाराला पकडण्यात आलेले नाही. तपासातली दिरंगाई अक्षम्य आहे. याकडे जनतेचे व शासनाचे लक्ष वेधण्यासाठी व खूनाचा निषेध करण्यासाठी हा मॉर्निंग वॉक करण्यात आला होता.

डॉ. दाभोलकर, कॉ. पानसरे यांच्या हत्या मॉर्निंग वॉक ला गेलेले असताना झाल्या, म्हणूनच निर्भयपणे हा वॉक काढण्यात आल्याचे समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. शांततेने काढलेल्या या वॉक मध्ये अनेक कार्यकर्ते सहभागी झाले होते. यामध्ये पनवेल शाखेच्या कार्यकर्त्यांबरोबरच कामोठे, नावडे- तळोजेचे कार्यकर्ते तसेच राष्ट्र सेवा दलाचे संतोष ठाकूर व कार्यकर्ते सहभागी होते. तसेच राज्य निमंत्रक सदस्य उल्हास ठाकूर व रायगड जिल्हा विविध उपक्रम कार्यवाह प्रभाकर नाईक हे सुद्धा उपस्थित होते.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचा दि २० ऑगस्ट २०१३ रोजी झालेल्या खुनाच्या दुःखद घटनेला आज (२० ऑगस्ट) आठ वर्ष पूर्ण झाली. त्यानंतर डावे विचारवंत आणि राजकीय कार्यकर्ते कॉम्रेड गोविंद पानसरे यांची कोल्हापूर येथे त्यांच्या घराजवळ बंदुकधारी मारेक-यांनी गोळ्या झाडून हत्या केली. डॉ नरेंद्र दाभोलकर आणि कॉम्रेड गोविंद पानसरे यांनी आपले संपूर्ण आयुष्य फुले, शाहू, आंबेडकर आणि प्रबोधनकार ठाकरे यांच्या सारख्या विचारवंतांच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार करण्यात खर्च करून महाराष्ट्राच्या पुरोगामी विचारात भर घातली आहे. आपण एका बाजुला महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे असे म्हणता आणि दुस-या बाजूला महाराष्ट्रात पुरोगामी विचारवंतांचे खून पडतात हे महाराष्ट्रासाठी नक्कीच भूषणावह नाही. डॉ. एम एम कलबुर्गी हे महात्मा बसवेश्वर यांच्या विचारांचे अभ्यासक आणि संशोधक होते. तसेच ते हम्पी विद्यापीठ, कर्नाटक चे कुलगुरू होते. साहित्य अकादमीचा २००६ साली त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता. लिंगायत विचारधारेतील ते एक पुरोगामी विचारवंत होते. तसेच त्यांनी अंधश्रद्धांना विरोध केला होता. त्यामुळेच त्यांची धारवाड येथे ३० ऑगस्ट २०१५ रोजी त्यांच्या राहत्या घरी गोळ्या झाडून हत्या केली.

त्याचप्रमाणे गौरी लंकेश या बैंगलोर, कर्नाटक मधील पत्रकार व सामाजिक कार्यकर्ता होत्या. गौरी लंकेश पत्रिका नावाचे साप्ताहिकाच्या त्या संपादक होत्या. धार्मिक मुलतत्ववादी, अंधश्रद्धा आणि जातिय भेद यांच्या विरोधी त्या सातत्याने लिहीत होत्या. स्त्री चळवळीत सुध्दा त्यांचा सहभाग असे. या कामांसाठी त्यांना आण्णा पालीटकौवस्क पुरस्कार मिळाला होता. त्यांचा सुद्धा ५ सप्टेंबर २०१७ रोजी त्यांचा त्यांच्या घराच्या बाहेर खून करण्यात आला. त्यामुळे शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या खुन्यांना योग्य वेळी अटक होऊन त्यांच्या खुनाचा तपास, सूत्रधारापर्यंत पोहचला असता तर त्यानंतर झालेले कॉम्रेड गोविंद पानसरे, डॉ. प्रा.एम एम कलबुर्गी, पत्रकार गौरी लंकेश यांचे खुन झाले नसते, म्हणूनच आम्ही अजुनही तपासात होत असलेली दिरंगाई आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो, असे प्रतिपादन अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने करण्यात आले. शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या निर्घृण खुनाच्या तपासात होणा-या अक्षम्य दिरंगाई बाबत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे देण्यासाठी शुक्रवारी सकाळी पनवेल तहसीलदार विजय तळेकर यांना अंनिसच्या वतीने पत्र देण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र अंनिस कार्यवाहक आरती नाईक, राष्ट्र सेवा दल रायगड जिल्हा संघटक संतोष ठाकूर, राज्य निमंत्रित उल्हास ठाकूर, महेंद्र नाईक, प्रभाकर नाईक, महेंद्र पाटेकर, सिद्धेश गोसावी, वैभव शिंदे, सुहास वायंगणकर, धनाजी फडके यांच्यासह समितीचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

कार्यकारी दंडाधिकारी, पनवेल

सद्भावना दिनानिमित्त जिल्हाधिकारी यांनी उपस्थितांना दिली सद्भावना प्रतिज्ञा

दै.रायगड नगरी । अलिबाग

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समिती सभागृहात सद्भावना दिवस संपन्न झाला. या निमित्ताने जिल्हाधिकारी श्रीमती निधी चौधरी यांनी उपस्थितांना सद्भावना दिवस प्रतिज्ञा दिली.

यावेळी अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) सर्जेराव मस्के-पाटील, उपजिल्हाधिकारी (रोहयो) सुषमा सातपुते , तहसिलदार सतिश कदम, विशाल दौंडकर तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील इतर अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे : कोन, ता.पनवेल, जि.रायगड येथील खाली सविस्तरपणे नमूद केलेली मिळकत आमचे अशिलांनी सदरहू मिळकतीचे मालकांकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे : कोन, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड

जमीन मालकांचे नाव	गट क्रमांक व उपविभाग	क्षेत्र हे.आर.चौ.मी.	आकार रु.पै.
दिनकर आंबो म्हात्रे **अनंता आंबो म्हात्रे** **चेतना राघो म्हात्रे** **शितल राघो म्हात्रे** **प्रियांका राघो म्हात्रे** **वैभव राघो म्हात्रे** **निशांत राघो म्हात्रे** **कमला राघो म्हात्रे** **हिराबाई आंबो म्हात्रे** **जनाबाई धर्मा म्हसकर**	२९/५/ब	०-३६-६० पो.ख. ०-०६-४० एकूण ०-४३-००	३.१३

तरी सदरहू वर नमूद मिळकतीबद्दल कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात.

वरील मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध, निर्दोष व बोजारहीत असल्याचे गृहीत धरुन आमचे अशिल सदरहू मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार कलो जाणार नाही याची नोंद घ्यावी.

पनवेल
दि.२०/०८/२०२१

सही/-
सुवर्णा म. वत्सराज
ॲडव्होकेट, पनवेल
फ्लॅट नं.३०४, आदित्य विहार सोसायटी,
जुन्या पोस्टाजवळ, महात्मा फुले रोड,
ता.पनवेल, जि.रायगड
फोन नं.९८३३६३९०४१

पृष्ठ क्र.१ वरुन...

उरण तालुक्याला खासगी कंटेनर गोदामे व अन्य भरावांचा विळखा

करून गायब करण्याचे कारस्थान येथील विकासक करीत आहेत. खाडीकिनाऱ्याची जागा मोकळी करून त्या ठिकाणी बेकायदेशीर भराव करून अतिक्रमण करणाऱ्यांची संख्या तालुक्यात अधिक प्रमाणात वाढली असल्याचे निदर्शनास येत आहे.परिणामी कंटेनर गोदामे आणि तथाकथित विकासक यांच्याकडून करण्यात येत असलेल्या मातीच्या भरामुळे पाण्याचा निचरा करणारे नैसर्गिक नाल्याचे स्रोत बंद झाल्याने येथील गावातीला घरांना पुराच्या पाण्याचा फटका बसू लागला आहे.

त्यात काही महसुली जमिनीवरीलही भरवामूळेही खाडी जवळ असलेल्या व अन्यही महसुली गावांना खाजगी भरावांनी वेढा दिला असून,यामुळे पावसाळ्यात अनेकांचे घरात पुराचे पाणी शिरून अन्न धान्य आणि जीवनावश्यक वस्तूंच्या अतोनात नुकसान झाल्याच्या घटना मागील १९ जुलै रोजी उरण तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे घडल्या आहेत.पुरामुळे नुकसान झालेल्या घरांचे नुकसानीचे पंचनामे करण्यात आले आहेत.मात्र या रहिवाशांना आजतागायत पुरातील नुकसान भरपाई मिळालेली नाही.त्यामुळे येथील जनसामान्यांना भरावामुळे पुराचे पाणी घरात शिरून झालेल्या नुकसानीचा सामना दरवर्षी करावा लागत आहे. दरवर्षी पावसाळ्यातील होत असलेल्या अतिवृष्टीमुळे होणारे नुकसान आणि त्यावर कोणती उपाय योजना करावी, यासाठी राज्यकर्त्यांना वेळच नाही.घटना, दुर्घटना घडेल तेवढ्या पुरती वचनपूर्ती केली जाते.मात्र दरवर्षी तालुक्यात होणाऱ्या प्रचंड प्रमाणातील मातीचे भराव यांना आळा घालण्यासाठी शासनाकडून प्रयत्न देखील होत नसल्याने गावपरिसरातील गरीब व सामान्य नागरिकांना त्याचा मोठा फटका बसत आहे.

गारभट खिंडीतील उतारावरील झाडे ठरत आहेत धोकादायक

संख्याही फार मोठी आहे.त्यामुळे या मार्गावर नेहमीच रहदारी आढळून येते. तसेच हा परिसर अतिदुर्गम,डोंगराळ व निसर्गरम्य परिसरात असल्याने व या भागात असणारे डॉक्टर फार्म व साई फार्म तसेच सुप्रसिद्ध असणारा ऐनवहाळ यामुळे बाहेरून येणा-या पर्यटकांची संख्याही मोठी आहे.तसेच नुकतेच चार दिवसापूर्वी गेल्या काही वर्षानंतर रोहा ते विठ्ठलवाडी लाल परीही धाऊ लागल्याने आता तरी संबंधित प्रशासन यंत्रणेने याकडे लक्ष पुरवावे तर गारभट खिंडीतील उतारावरील कोसळण्याच्या स्थितीत असणारी झाडे धोकादायक ठरत आहेत. तरी संबंधितांनी लवकरच या गंभीर बाबीकडे लक्ष देण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

मी प्रबोधनकार ठाकरेही वाचलं अन् यशवंतराव चव्हाणही

अभिमान होता. तसेच जातीवरती मतदानही व्हायचं आणि ते आजही होतं. मला सध्या सध्या महाराष्ट्रामध्ये असं दिसतं की, लोकांना जातीबद्दल अभिमान हा आहेच, पण दूसऱ्याच्या जातीबद्दलचा द्वेष वाढत गेला आहे. हे महाराष्ट्राच्या एकूण सांस्कृतीला डाग लावणार चित्र आहे, असं राज ठाकरे यांनी सांगितलं होतं.

तसेच प्रत्येकाला आपल्या जातीबद्दल अभिमान असतो. मात्र दूसऱ्याच्या जातीबद्दल द्वेष हा वाटणं, हे कधी महाराष्ट्रात नव्हतं. हे गेल्या २०-२५ वर्षांपासून सुरु झालं. जातीचा मुद्दा त्यांच्या त्यांच्या नेत्यांच्या ओळखीचा भाग झाला आहे. महाराष्ट्रात जातीचा मुद्दा हा सर्वांथाने मोठा झाला असेल, तो म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जन्मानंतर. कोण जेम्स लेन, कसलं पुस्तक लिहिलं? तो काय जॉर्ज बर्नार्ड शॉ होता. बरं तो आता कोण आहे आणि कुठे आहे? त्या सगळ्या वातावरणात मराठा समाजाच्या मुलांना, मुलींना, हे कोणी लिहिले तर ब्राम्हणांनी लिहिले मग माळी समाज मग इतर समाज हे सगळं रचलेलं आहे, असं राज ठाकरे यांनी म्हटलं होतं.

सीताबाई शामा बडवे यांचे निधन

दै.रायगड नगरी । पनवेल

लोणीवली, चिखले येथील सीताबाई शामा बडवे यांचे वयाच्या ९५ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले आहे.

त्यांच्यावर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पछात मुलगा, नातू, नात असा परिवार आहे.

अर्जदाराचे वकील : अधिवक्ता, भुपेश तानाजी पेमारे

जाहीर नोटीस

कर्जत येथील मा.प्रधान दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
चौकशी अर्ज नं.८३/२०२१
नि.नं.७/ड

श्रीम.भिमाबाई बाळकृष्ण पवार — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

१) कै.बाळकृष्ण दाजी पवार हे सदरील अर्जदार यांचे पती होते व कै. जोस्ना बाळकृष्ण पवार ही अविवाहित मुलगी होती. त्यांना सदरील अर्जदार यांचे व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाही.

२) महाराष्ट्र शासनाने जून २०१५ च्या सुमारास जी.आर.काढून वारस म्हणून नावे नमूद करण्याकरिता दिवाणी न्यायालयाचा वारस दाखला असणे आवश्यक आहे असे ठरविले आहे.

३) सदरील अर्जदार ह्याच कै.बाळकृष्ण दाजी पवार यांची एकमात्र वारस आहे. तसे नाममात्र घोषित (फॉर्मल डिक्लेरेशन) करून मिळण्याकरिता हा अर्ज या मा.न्यायालयात दाखल केलेला आहे. कै.बाळकृष्ण दाजी पवार यांच्या शेतजमीन मिळकतीस अर्जदार यांस वारस म्हणून नाममात्र घोषित (फॉर्म डिक्लेरेशन) करून मिळण्याकरिता अर्ज या मा.न्यायालयात दाखल केलेला आहे. सबब, अर्जदार यांचे वारस हक्कास जर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी ही हरकत आमचेकडे लेखी पुराव्यासह ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत नोंदवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास हे मा.न्यायालय पुरावा घेवून योग्य वाटल्यास अर्जदार यांस वारस दाखला देईल. मागाहून कोणाचीही हरकत आल्यास ती विचारात घेतली जाणार नाही.

आज दि.२० ऑगस्ट २०२१ रोजी आमच्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/-
लिपीक
दि.न्या.व.स्तर, कर्जत

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, कर्जत

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.मनोजकुमार कारक, राहणार : फ्लॅट नं.२०२, एच-विंग, गुरुविहार कॉम्प्लेक्स, प्लॉट नं.२० बी, सेक्टर ११, कळंबोली नवी मुंबई ४१०२१८. तरी आमचे अशिल यांचे नावे असलेले फ्लॅट नं.२०२, एच-विंग, गुरुविहार कॉम्प्लेक्स, प्लॉट नं.२० बी, सेक्टर ११, कळंबोली नवी मुंबई-४१०२१८ क्षेत्रफळ ४४.१० चौ.मी. या सदर सदनिकेचे मुळ ॲग्रीमेंट फॉर सेल मे.ओम गुरुकृपा इंटरप्रायझेस आणि दलजीत सिंग धारीवाल यांच्यामध्ये झालेले होते. सदर दस्त क्र.०९७६६/२००६ यांच्याकडून गहाळ झालेली आहे व त्याबाबत कळंबोली पोलीस स्टेशनमध्ये दि.१२/०८/२०२१ रोजी मिसिंग रजिस्टर नं.०८५३/२०२१ अन्वये कायदेशीर नोंद केलेली आहे.

खालील परिशिष्टात नमूद केलेल्या सदर मिळकतीबाबत कोणाचाही विक्री, देवाण-घेवाण, गहाण, विश्वस्त संस्था, वारसा भाडेकरार, ताबा, खरेदीखत, बक्षिस, मृत्यूपत्र, वाटप पत्र व इतर कोणतेही स्वरुपाचा करार असल्यास अगर इतर कोणत्याही स्वरुपाचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांच्या पृष्ट्यार्थ सर्व कागदपत्रांची पुराव्यासह खालील कार्यालयीन पत्यावर सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत सुचित करणे आवश्यक आहे. जर असा प्रकारची कोणतीही हरकत कोणीही उपस्थित केली नाही तर खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीशी कोणाचाही कसलाही हितसंबंध राहणार नाही अथवा असल्यास तो सोडून देण्यात आला आहे असे समजण्यात येईल. प्रस्तुतच्या मुदतीनंतर सदरच्या रुमबाबतीत कोणालाही व कसलीही हरकत आल्यास ती ग्राह्य धरली जाणार नाही व आमचे अशिल सदर परिशिष्टात वर्णन केलेल्या रुम बाबत खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन

फ्लॅट नं.२०२, एच-विंग, गुरुविहार कॉम्प्लेक्स, प्लॉट नं.२० बी,
सेक्टर ११, कळंबोली, नवी मुंबई-४१०२१८

सही/-
ॲड.राजेश आर. चौधरी
शॉप नं.०८, कृष्णा टॉवर,
सेक्टर ५ ई, कळंबोली,
नवी मुंबई-४१०२१८

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

संक्षिप्त...

लाखो रुपयांचे दागिने व रोख रक्कम घेऊन पळुन गेलेल्या ज्वेलर्स बधुंचा पोलिसांकडून शोध सुरु

दै.रायगड नगरी । पनवेल

ऐरोली सेक्टर-८ भागात विकास ज्वेलर्स नावाने ज्वेलर्स दुकान चालवणाऱ्या दोघा भावांनी ऐरोलीतील अनेक लोकांकडून उसनवारीने दागिने व लाखो रुपये घेऊन त्यांचे दागिने व रोख रक्कम त्यांना परत न करता दुकान बंद करुन पलायन केल्याचे उघडकिस आले आहे. विकास जैन व धर्मेंद्र जैन अशी या दोघा भावांची नावे असून रबाळे पोलिसांनी त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करुन त्यांचा शोध सुरु केला आहे.

या प्रकरणातील आरोपी विकास जैन व धर्मेंद्र जैन या दोघा भावांनी ऐरोली सेक्टर-८ मध्ये विकास ज्वेलर्स नावाने दुकान थाटले होते. त्यामुळे त्यांची ऐरोलीतील अनेक लोकांसोबत चांगली ओळख झाली होती. या दोघांनी २०१७ मध्ये आर्थिक अडचण असल्याचे सांगून आपल्या ओळखीतल्या काही लोकांकडून उसनवारीने पैसे व दागिने घेतले होते. सुरुवातीला त्यांनी त्यांचे दागिने व रोख रक्कम वेळेत परत करुन त्यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर जैन बधुंनी डिसेंबर-२०२०मध्ये आर्थिक अडचण असल्याचे सांगून मुलुंड येथे रहाणारे सोमनाथ सानप यांच्याकडून १ लाख रुपये रोख व ६ लाख १५ हजार रुपये किंमतीचे १३१ ग्रॅम वजनाचे दागिने १५ दिवसांसाठी मागुन घेतले होते. तसेच त्याबदल्यात १० हजार रुपये व त्या कालावधीत दागिने न दिल्यास १० टक्के दराने दंड देण्याचे मान्य केले. मात्र महिना लोटल्यानंतर देखील जैन बंधुकडून सानप यांना मोबदला अथवा परतावा न मिळाल्याने सानप यांनी त्यांना संपर्क साधला असता, त्यांनी करोनामुळे अडचण आल्याचे सांगून सानप यांना पैसे आणि दागिने देण्यास टाळाटाळ केली. त्यानंतर देखील सानप यांनी जैन बंधुंना अनेकवेळा संपर्क साधला मात्र, त्यांनी वेगवेगळी कारणे सांगून टाळाटाळ केली. याचदरम्यान जैन बधुंनी सानप यांचे भाऊ संपत सानप यांच्याकडून देखील सुमारे १० लाख रुपये किंमतीचे २१३ ग्रॅम ७६० ग्रॅम वजनाचे दागिने १२ महिन्यांच्या अटीवर घेतल्याचे व त्यांचे दागिने सुद्धा देण्यास ते टाळाटाळ करत असल्याचे सानप यांना समजले. त्यानंतर सानप बंधुनी जैन बंधूंच्या दुकानावर जाऊन पाहणी केली असता, ते दुकान बंद करुन पळून गेल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर सानप यांनी त्यांची अधिक माहिती काढली असता, जैन बधुंनी त्यांच्याप्रमाणेच ऐरोलीतील अनेक लोकांकडून सोन्याचे दागिने व रोख रक्कम घेऊन पलायन केल्याचे त्यांना समजले. त्यानंतर त्यांनी रबाळे पोलीस ठाण्यात धाव घेऊन पार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी जैन बधुं विरोधात फसवणुकिसह अपहाराचा गुन्हा दाखल करुन त्यांचा शोध सुरु केला आहे.

माथेरान मिनिट्रेनची उत्तुंग भरारी

दै.रायगड नगरी । माथेरान

माथेरानच्या पर्यटनाला चालना देणारी आणि आबालवृद्धांची आवडती महाराष्ट्रातील एकमेव नॅरोगेज ‘माथेरानची राणी’ म्हणजेच मिनीट्रेन ही पुन्हा युनेस्कोच्या हेरिटेजसाठी सज्ञ झाली आहे. याबाबत नुकतेच रेल्वेचे अधिकारी यांनी माथेरानला भेट दिली असून यात काही माथेरानचा सांस्कृतिक वारसा जपणारी माहिती मध्य रेल्वेला हवी असल्याने माथेरान नगरपालिकेत अर्ज दाखल केला आहे.

१९०१ मध्ये येथील उद्योगपती सर आदमजी पिरभाय यांनी स्वतःचे १६ लाख रुपये खर्चून ही रेल्वे बनविण्याचा निर्णय घेतला. मुलगा अब्दुल हुसेन आदमजी पिरभाय यांनी १९०७ मध्ये या रेल्वेचे काम पूर्ण केले आणि ही मिनीट्रेन जोमाने सुरू झाली. स्वातंत्र्यानंतर ही मिनीट्रेन भारत सरकारच्या अखत्यारित आली. त्यावेळी वाफेच्या इंजिनवर ही मिनीट्रेन धावत होती. १९८३ मध्ये वाफेचे इंजिन बंद करून डिझेलवर धावणारी इंजिन वापरली जाऊ लागली. ११४ वर्षे उलटूनही ही मिनीट्रेन आजही डौलात धावत आहे.

२००२ च्या दरम्यान ही मिनीट्रेन युनेस्कोच्या हेरिटेज दर्जासाठी नामनिर्देशित करण्यात आली होती. याबाबत युनेस्कोच्या टीम सुद्धा माथेरानमध्ये येऊन गेली.

मात्र काही तांत्रिक बाबींमुळे भारतीय रेल्वे आणि माथेरानकरांचे स्वप्न भंगले. मात्र आता पुन्हा मध्य रेल्वेने युनेस्कोकडे अर्ज दाखल केला आहे व युनेस्कोकडून या अर्जाचा स्वीकार करण्यात आला असून याबाबत उप मुख्य पर्यावरण एवं गृहव्यवस्था प्रबंधक शिवाजी कदम यांनी माथेरान नगरपालिकेस पत्र लिहिले आहे. या पत्रामध्ये माथेरानमधील सांस्कृतिक वारसा जपणारी माहिती रेल्वेच्या संकेतस्थळावर मागविण्यात आली आहे. यावेळी सिनियर सेक्शन इंजिनियर सुशिल सोनावणे तसेच रेल्वे कामगार सेनाचे सचिव दगडू आव्हाड यांनी अर्ज दाखल केला आहे. मात्र युनेस्कोने माथेरान मिनीट्रेनला हेरिटेज दर्जा दिला तर भारतीय रेल्वे याना मोठी रक्कम असलेल बक्षीस मिळेल. तर या हेरिटेज दर्जामुळे माथेरानमध्ये मनाचा तुरा रोवला जाईल.

> माथेरानची मिनीट्रेन ही पुन्हा युनेस्कोच्या हेरिटेज दर्जासाठी नामनिर्देशित करण्यात आली आहे. ही माथेरानकरांसाठी अभिमानाची बाब आहे. माथेरान नगरपरिषदे कडून जी काही माहिती रेल्वेला हवी असेल ती आम्ही देण्यास तयार आहोत. लवकरच त्यांनी मागितलेली माहिती त्यांना दिली जाईल.
>
> **- प्रेरणा प्रसाद सावंत, नगराध्यक्षा**

> २००२ च्या दरम्यान मी लोकप्रतिनिधी असताना युनेस्कोकडून माथेरान मिनीट्रेन हेरिटेज दर्जा देण्यासाठीचा प्रयत्न अयशस्वी झाला होता. मात्र मिनीट्रेनबाबत युनेस्कोने अर्ज स्वीकारल्यामुळे जर मिनीट्रेनला हेरिटेज दर्जा मिळाला तर माथेरान हे जगाच्या नकाशावर ठळकपणे दिसेल.
>
> **- अजय सावंत, माजी नगराध्यक्ष**

माथेरानमधील सांस्कृतिक वारसाबाबत हवी असलेली माहिती

- माथेरान मधील सांस्कृतिक उपक्रमाचे फोटो
- वन्यजीव आणि दुर्मिळ प्रजातींचे फोटो
- वनस्पती आणि विशिष्ट प्रदेशातील किव्हा
- कालखंडातील प्राणिजात याविषयी माहिती
- पिके आणि अन्न
- मिनिट्रेनचा माथेरान मधील लोकांच्या तसेच
- आदीवासी भागावर होणारा परिणाम
- कचर्यांची विल्हेवाट लावण्याची पद्धती
- ऊर्जा आणि वनसंवर्धनाची पद्धती
- व्यवसाय आणि दैनंदिन उपजीविका
- स्थानिक परंपरा आणि सण याबाबत माहिती

कळंबुसरे येथे शेतकऱ्यांना ई पीक पाहणी मार्गदर्शन

दै.रायगड नगरी । उरण

माझी शेती, माझा सात बारा, मीच नोंदविणार माझा पीक पेरा महाराष्ट्र शासनाने सुरू केलेल्या इ पीक पाहणी प्रकल्प अंतर्गत मौजे कळंबुसरे येथे शेतकरी प्रशिक्षण वर्ग पार पडला. राज्य शासनाने नुकताच इ पीक पाहणी प्रकल्प राज्य भर सुरू केलेला आहे.

या प्रमाणे शेतकरी इ पीक मोबाईल अप मधून स्वतः शेतात लावलेली पिके व फळबाग,सिंचन पद्धती,शेतातील झाडे, इत्यादी माहिती इ पीक पाहणी अँप मधून भरणार आहेत. यावरून गाव नमुना १२ मध्ये पिके अद्यावत केली जातील, या प्रकल्पामुळे शेतकरी आपल्या पिकाबाबत आत्मनिर्भर होत अशी अपेक्षा आहे. ग्रामस्तरावर प्रचार व प्रसिद्धचे काम राज्यभर सुरू असून उरण तालुक्यातील कळंबुसरे या गावात शेतकरी बांधवांचे प्रशिक्षण पार पडले, प्रशिक्षण साठी गावाचे सरपंच नूतन नाईक, ग्रामसेविका स्वाती पाटील तसेच गावातील जेष्ठ नागरिक आदी ग्रामस्थ शेतकरी मंडळी उपस्थित होते.

मोठीजुई सजेचे तलाठी शशिकांत सानप यांनी उपस्थिताना इ पीक पाहणीमुळे शेतकऱ्यांना थेट शासकीय मदत,शेतमाला ची आधारभूत किंमत,विकेल ते पिकेल योजना, नैसर्गिक आपत्तीचे नुकसान भरपाई,

पिकाची अवस्था, पेरणी व पिकाखालील सिंचनक्षेत्र या बाबत प्रशिक्षणामध्ये माहिती देण्यात आली.सदर प्रशिक्षणासाठी उरणचे तहसिलदार भाऊसाहेब अंधारे यांचं मार्गदर्शन मिळाले आहे.

पनवेलच्या विजय सेल्स शोरूम मधील ४४ हजार रुपये किमतीच्या लॅपटॉपची चोरी

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल येथील विजय सेल्स शोरूम मधून ४४ हजार रुपये किमतीच्या एचपी कंपनीच्या लॅपटॉपची चोरी करण्यात आली आहे. पनवेल शहर पोलिस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

१७ ऑगस्ट रोजी शोरुम सुरू केल्यानंतर शोरूम मध्ये ४० लॅपटॉप डिस्प्ले टेबलावर लावले होते. यावेळी सेल्समन येणाऱ्या ग्राहकांना लॅपटॉप दाखवून त्यांची किंमत व माहिती देण्याचे काम करत होते.

यावेळी एक लॅपटॉप कमी असल्याचे लक्षात आले. तेव्हा दुकानाचे सीसीटीव्ही चेक केले असता एक इसम लॅपटॉप घेऊन जाताना दिसला. ४४ हजार रुपये किमतीचा लॅपटॉप चोरी केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रेल्वे प्रवाशाचा मोबाईल फोन व पाकिट लुटून पळणारा लुटारु जेरबंद

दै.रायगड नगरी । पनवेल

जुईनगर रेल्वे स्थानकाजवळ रेल्वे रुळावरुन पायी चालत जाणाऱ्या तरुणाला धमकावुन त्याच्याजवळचा मोबाईल फोन आणि पाकिट लुटून पळण्याच्या बेतात असलेल्या लुटारुला वाशी रेल्वे पोलिसांच्या गुन्हे प्रकटिकरण पथकाने रंगेहात अटक केली आहे. फिरोज सलीम खान (१८) असे या लुटारुचे नाव असून पोलिसांनी त्याच्याकडून लुटलेला मोबाईल फोन व पाकिट हस्तगत केले आहे.

या घटनेतील तक्रारदार मंगेश वराळ (३३) हा जुईनगरमध्ये रहाण्यास असून बुधवारी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास तो सानपाडाच्या दिशेने रेल्वे रुळातून पायी चालत जुईनगर रेल्वे स्थानकात येत होता. याचवेळी आरोपी फिरोज खान याने त्याला धमकावुन त्याच्याजवळचा मोबाईल फोन व त्याचे पाकिट जबरदस्तीने लुटून जुईनगर रेल्वे स्थानकाच्या दिशेने पलायन केले. त्यामुळे मंगेशने देखील आरडा-ओरड करत त्याला पकडण्यासाठी त्याचा पाठलाग सुरु केला. हा प्रकार जुईनगर रेल्वे स्थानकात गस्तीवर असलेल्या गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोलीस उपनिरीक्षक भिंगारदिवे व त्यांच्या पथकाला निदर्शनास आल्यानंतर त्यांनी पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या आरोपी फिरोज खान याला पकडले.

त्यानंतर मंगेश वैराळ याने घडल्या प्रकाराची माहिती पोलिसांना दिल्यानंतर पोलिसांनी आरोपी फिरोज खान याची झडती घेतली असता, त्याच्याजवळ मंगेश वराळ याच्याकडून लुटलेला दहा हजार रुपये किमतीचा ओपो कंपनीचा मोबाईल फोन व पाकीट आढळुन आले. त्यानंतर आरोपी फिरोज खान याच्यावर वाशी रेल्वे पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करुन त्याला अटक करण्यात आल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक विष्णु केसरकर यांनी दिली.

७ महिन्यानंतर ‘त्या’ वृद्ध माजी सैनिकाची पेन्शनसाठीची फरपट थांबली

हयातीचा दाखल्यासाठी हाताचे ठसे उमटत नसल्याने घेतला डोळ्यांचा स्कॅन

दै.रायगड नगरी । सुधागड/पाली

सुधागड तालुक्यातील वृद्ध माजी सैनिक बबन गोळे यांचे निवृत्तीचे वेतन हयातीचा दाखला सादर न केल्याने मागील ७ महिन्यांपासून जमा झाले नव्हते. हाताचे ठसे येत नसल्याने दाखला मिळत नव्हता. त्यासाठी त्यांची फरपट सुरू होती.

अखेर पालीतील ईसेवा केंद्राचे चालक निलेश शिर्के यांनी स्व खर्चाने डोळ्यांचे स्कॅन करणारे मशीन आणून त्याद्वारे गोळे यांना हयातीचा दाखला १५ ऑगस्टला मोफत मिळवून दिला आहे. आणि वृद्ध माजी सैनिकांना मोफत हयातीचा दाखला देण्याचा संकल्प केला.

निलेश शिर्के यांनी सांगितले की बबन गोळे माझ्या सेवाकेंद्रात डिसेंबर २०२० मध्येच त्यांचा हयातीचा (जीवन प्रमाणपत्र) दाखला ऑनलाइन सादर करण्यासाठी आले होते. मात्र वयोमानानुसार त्यांच्या हाताचे ठसे घेता येत नव्हते. त्यांच्या डोळ्याचे चित्र (iris scan) घेऊन ते शक्य होते मात्र त्या साठीचे लागणारे iris scaner माझ्याकडे उपलब्ध नव्हते. त्यानंतर गोळे यांनी डोंबिवली सारख्या शहरी भागात फिरून हयातीचा दाखला (जीवन प्रमाणपत्र) सादर करण्याचा प्रयत्न केला.

मात्र त्यांना तेथेही ते उपलब्ध झाले नाही. एका सैनिकांची सेवा करता आली नसल्याने मी स्वतः त्यामुळे बेचैन होतो. असे निलेश शिर्के यांनी सांगितले. मग इरिस स्कॅनर आणून १५ ऑगस्ट ला पाली वरून डोंबिवली येथे गोळे यांच्या घरी जाऊन त्यांच्या डोळ्यांचा स्कॅन घेऊन हयातीचा दाखला काढून त्यांना अनोखी सलामी दिली.

त्यामुळे आता गोळे यांची पेन्शन त्यांच्या खात्यात जमा होणार आहे. या अनोख्या मदतीबद्दल सचिन गोळे यांनी निलेश शिर्के यांचे आभार मानले.

> जवानांचा सन्मान व सेवा करण्याची संधी फार कमी मिळते. आज ही संधी मला मिळाली त्यामुळे खूप समाधानी आहे. प्रत्येक सर्वसामान्य नागरिकाने देश सेवेसाठी झटणाऱ्या सैनिकांचा सन्मान करायलाच पाहिजे.
>
> **निलेश शिर्के, पाली**

पर्यावरणाचा समतोल राखण्यात तरुणांचा पुढाकार

पेणमध्ये घडतात प्रदुषण विरहीत ट्री गणेशमूर्ती

दै.रायगड नगरी । पेण

पेण हे गणपतीचे माहेरघर म्हणून संपूर्ण जगात ओळखले जाते. पेण तालुक्यातील जोहे, हमरापूर, कळवे, दादर व पेण शहरासह वाशी खारेपाट भागातील वढाव, दिव, तसेच परिसरात पीओपी व मातीचे गणपती कारखाने मोठ्या प्रमाणात आहेत. मात्र पर्यावरणाचा समतोल राखण्यात तरुणांनी पुढाकार घेतला असून प्रदुषण विरहीत ट्री गणेशमूर्ती बनविण्यास प्राधान्य देत आहेत.

गतवर्षी ’गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या’ या जयघोषाने निरोप दिल्या नंतर यावर्षी काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या गणेशोत्सवासाठी पेण तालुक्यांसह खारेपाट भागातील कारखान्यात गणेशाच्या मुर्ती आकार घेऊ लागल्या आहेत. गतवर्षीपेक्षा यावर्षी खारेपाट भागातील जेष्ठांसह तरुण व महिलांनी पर्यावरणाचा समतोल राखण्याच्या उद्देशाने प्रदूषण विरहित गणेश मूर्ती तयार करण्यात मग्न आहेत. सध्या या मूर्तींना मागणी जास्त असल्याने येथील मूर्तिकार रात्रं दिवस मेहनत घेत आहेत. सदर काम अंतिम टप्प्यात येऊन ठेपला आहे. पर्यावरणात मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असल्याने प्रदुषण विरहित गणेशमूर्ती तयार करण्याचा विचार करुन लाल माती पासुन ट्री गणेशमूर्ती म्हणजेच लाल माती पासुन गणेशमूर्ती बनवली जाते. व त्या सोबत गणेशमूर्तीच्या आकाराची कुंडी व वनस्पतीची बी दिली जाते. जेव्हा आपण गणेशमूर्तीचे विसर्जन करतो तेव्हा ही गणेशमूर्ती या कुंडीत विसर्जित करायची आहे. विसर्जन केल्या नंतर ती वनस्पतीची बी या कुंडीत टाकल्याने काही दिवसांनी कुंडीत छानस रोपटे तयार होते. या मुळे पर्यावरणातील प्रदूषण कमी होवून तयार झालेल्या वनस्पती पासुन निसर्गात ऑक्सीजन प्रमाण वाढून निसर्गाचा समतोल राखण्यास मदत होते.

काही वर्षापूर्वी पेण शहरापुरता मर्यादित असणारा हा व्यवसाय आज तालुक्यातील विविध भागांत मोठ्या प्रमाणात पसरला आहे. यंदा किमतीत २५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. खारेपाट भागात वाशी, कणे, बोरझे, वढाव, दिव, भाल येथिल तरुण मंडळी शिक्षित आहेत. मात्र नोकरी न मिळाल्याने जवळ-जवळ ६५ टक्के तरुण कारखान्यात गणेश मूर्ती तयार करण्यात व्यस्थ आहेत. यातून १५० ते १७५ जणांना रोजगार मिळतो.

> प्रदूषण विरहित गणेश मूर्तींना मोठ्या प्रमाणात मागणी असून जवळपास १0000 हजार मूर्तींनी खारेपाटातील कारखानात आकार घेतला आहे. मूर्तीला लागणाऱ्या लाल मातीच्या कमतरतेमुळे मूर्तीचा पुरवठा कमी होत असल्याचे दिव येथील मूर्तिकार अजित म्हात्रे यांनी बोलताना सांगितले.

संक्षिप्त...

उरण येथील रक्तदान शिबिराला उत्तम प्रतिसाद

दै.रायगड नगरी । उरण

उरण येथील बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकुल येथे आकाश जोशी यांच्या वाढदिवसानिमित्त मित्र परिवार तर्फे व महात्मा गांधी ब्लड बँक ठाणे यांच्या सहकार्याने रक्तगट चाचणी व रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.या रक्तदान शिबिराला जनतेचा उत्तम प्रतिसाद मिळाला असून एकूण ३० हुन अधिक रक्तदात्यांनी या रक्तदान शिबिरात रक्तदान केले. अनेकांनी आपले रक्तगट सुद्धा चेक करून घेतले. सदर रक्त गट चाचणी व रक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी आकाश जोशी व मित्र परिवाराने विशेष मेहनत घेतली.

या रक्तदान शिबिराला टायगर ग्रुपचे राष्ट्रीय उपाध्यक्ष भैया बडंगर,रायगड जिल्हाध्यक्ष -निलेश भाऊ चव्हाण, नवीमुंबई उपाध्यक्ष - संतोष बंडगर, पनवेल तालुका अध्यक्ष - शंकर जाधव, नवी मुंबई कार्याध्यक्ष - संजय अण्णा,पनवेल तालुका संपर्क प्रमुख - गुरुनाथ पाटील,पनवेल शहर अध्यक्ष-स्वप्निल जाधव, उपाध्यक्ष पनवेल शहर - गणेश खटपे,विकी पाटील सामाजिक संस्थेचे अध्यक्ष विकी पाटील, श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुदेश पाटील,चंदन महाराज आदी टायगर ग्रुपचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

पनवेल आरटीओ कार्यालय दलालांच्या विळख्यात

दै.रायगड नगरी । पनवेल

प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेल हे सर्वसामान्यांना त्रासदायक ठरत आहे. याठिकाणी कोणतेही काम वाढीव पैसे दिल्याशिवाय होत नसल्याचे समोर आले आहे. याबाबत पडताळणी केली असता, एजंटांविना कार्यालयात काडीही हालत नसल्याचे दिसून आले. परिवहन कार्यालय पनवेल येथील बहुतांशी कामांसाठी अधिकारीच नागरिकांना एजंटकडे पाठवत असल्याचे या पडताळणीदरम्यान समोर आले आहे. यातून नागरिकांची कामे होतात मात्र त्यांची लूट केली जात आहे.

येथील कार्यालयात पाय ठेवल्यानंतर एजंटांचाच गराडा पडल्याचे दिसून आले. एजंटाच्या हाती कागदपत्रे दिल्यानंतर काम नाकारण्याची १०० टक्के भीती नसल्याचे काही उमेदवार सांगतात. वाहनांची नोंदणी, लायसन्स, कर्जाचा बोजा, दंडात्मक कारवाई, अनेक तडजोडीच्या प्रकरणात एजंटाशिवाय काम चालत नसल्याचे चित्र आहे. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, मोटार वाहन निरीक्षक, सहायक मोटारवाहन निरीक्षकांच्या केबिनबाहेर एजंटाचा राबता आहे. जशी महागाई सतत वाढते, त्याच पद्धतीने हे एजंट सतत आपले दर वाढवून लागले आहेत. कोणी अटकाव करत नसल्याने आता एजंट हेच सर्वेसर्वा बनू लागले आहेत.

प्रादेशिक परिवहन कार्यालय
पनवेल
RTO, PANVEL

वाहन फिटनेस सर्टिफिकेट

वाहन फिटनेससाठी चारचाकी, ट्रक तसेच पिकअप या वाहनांसाठी ६00 ते १000 रुपये शासकीय फी आहे; परंतु येथे तीन ते चार हजारांपर्यंत रूपये घेतले जातात.

गाडी दुसऱ्याच्या नावावर करणे

दुचाकी ते मोठी वाहने नावावर करण्यासाठी ४00 ते २ हजार एवढा शासकीय खर्च आहे. प्रत्यक्षात मात्र दुप्पट, तिप्पट पैसे नागरिकांना द्यावे लागतात.

पर्मनंट लायसन्स

पर्मनंट लायसनची शासकीय फी ही ७६६ ते १३६६ हजार एवढी आहे; परंतु प्रत्यक्षात नागरिकांना साडेतीन ते चार हजार रुपयांपर्यंत खर्च येत असल्याचे दिसून आले.

आरटीओ कार्यालयाचा भूलभूलय्या

प्रादेशिक परिवहन कार्यालयात कोणाला भेटावे, कागद्पत्रे काय लागतील, हे कळु नये याचीच व्यवस्था असते. साहेब तुमचे काम करणार नाहीत असे एजंटकडून सांगितले जाते.

बहुतांश नागरिक काम लवकर व्हावे यासाठी वाढीव पैसे देऊन मार्गी लावत आहेत. अधिकाऱ्यांनी एजंटांकडे एखाद्या व्यक्तीला पाठवल्यानंतर काही मिनिटात पैसे देऊन ते काम पूर्ण होत असल्याचे यावेळी दिसून आले. आरटीओ टेस्ट तसेच इतर अनेक कामांसाठी ऑनलाइन सिस्टम असतानाही आरटीओ कार्यालयातूनच एजंटांनाच संपर्क साधण्यासाठी सांगण्यात येते.

बोर्ली स्थानकावरील हायमास्ट व वीजेच्या खांबाला वेलींचा विळखा

महावितरण, ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष

दै.रायगड नगरी । कोर्लई

गेल्या काही दिवसांपासून मुरुड तालुक्यातील बोर्ली स्थानकावरील हायमास्ट दिवे व वीजेच्या खांबाला वेलींचा विळखा असून याकडे संबंधित महावितरण व ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष दिसून येत आहे.

अलिबाग-मुरुड रस्त्यावर एस.टी् स्थानक परिसरात असलेल्या व सुरई- बोर्ली गावात जाणा-या ऐन मोक्याच्या ठिकाणी असलेल्या या हायमास्ट दिवे व वीजेच्या खांबाला असलेल्या वेलींच्या विळख्यामुळे वेळप्रसंगी केव्हाही वीजेचा शॉक लागून अपघाताची शक्यता नाकारता येत नाही.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी व संबंधित ग्रामपंचायतीने यात लक्ष पुरवून बोर्ली स्थानकावरील हायमास्ट दिवे व वीजेच्या खांबाला असलेल्या वेलींचा विळखा हटविण्यात यावा. अशी मागणी जोर धरीत आहे.



महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघाच्या वतीने

एकात्मिक बालविकास सेवा प्रकल्प कार्यालयात करण्यात आले मोबाईल जमा

दै.रायगड नगरी । पनवेल

पोषण अभियानांतर्गत अंगणवाडी सेविकांना शासकीय कामासाठी मोबाईलचे वाटप २०१९ साली करण्यात आले होते. सदर मोबाईलची वॉरंटी दोन वर्षे कालावधी असून तो कालावधी मे २०२१मध्ये संपला आहे. त्यामुळे देण्यात आलेला मोबाईल हा हँग होत असल्याने तसेच लवकर गरम होत असल्याने त्या मोबाईलवर काम करणे कठीण झाल्याने अखेर आज महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघचे अध्यक्ष एम.ए. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल येथील एकात्मिक बालविकास सेवा प्रकल्प कार्यालयात हे जमा करण्यात आले.

देण्यात आलेले मोबाईल हे निष्कृष्ट दर्जाचे आहेत. त्याच्या दुरूस्तीसाठी नाहक भुर्दंड अंगणवाडी कर्मचाऱ्यांना बसतो. याच्यात माहितीसुद्धा अपूरी राहत असल्याने कामही पूर्ण होत नाही. तरी चांगल्या प्रतीचा मोबाईल देण्यात यावा या मागणीसाठी आज त्यांनी आपल्याकडील मोबाईल जमा केले आहेत.

व्यापाऱ्यांच्या अडचणी संदर्भात शिवसेनेने घेतली वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांची भेट

दै.रायगड नगरी । पनवेल

कळंबोली वसाहतीतील स्टील मार्केट परिसरात उद्योगधंदा करणाऱ्या अनेक व्यापाऱ्यांना वीजेच्या प्रश्नावरून नाहक त्रास होत आहे. या विविध मागण्यांसदर्भात कळंबोली शिवसेना पदाधिकाऱ्यांनी वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांच्यासमोर व्यापाऱ्यांची कैफियत मांडून लवकरात लवकर सुरळीत वीज पुरवठा करावा अशी मागणी केली.

जिल्हाप्रमुख शिरीष घरत व महानगरप्रमुख रामदास शेवाळे यांच्या आदेशाने आणि विधानसभा समनव्यक प्रदीप ठाकूर व डी एन मिश्रा कळंबोली शहरप्रमुख यांच्या मार्गदर्शनाने कळंबोली शिवसेना पदाधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ स्टील मार्केट महावितरण कार्यालयातील अधिकारी घुमे यांची भेट घेतली. यावेळी शिवसेना विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकूर, कळंबोली शहरप्रमुख डी एन मिश्रा, शहर समन्वयक गिरीश धुमाळ, शहर संघटक अक्षय साळुंखे, उपशहरप्रमुख सूर्यकांत म्हसकर,उप शहर प्रमुख नारायण फडतरे विभाग प्रमुख महेश गुरव, सागर आवताडे आणि इतर पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

या बैठकीत विविध समस्यांवर चर्चा करण्यात आली. मुख्यतः ग्राहकांची होणारी गैरसोय अपुरा स्टाफ आणि मुख्य कार्यालयाकडून मिळणाऱ्या अपुऱ्या वस्तू आणि केबल या विषयावर चर्चा करण्यात आली.

आगामी निवडणुकांमध्ये रायगडात भगवा फडकवण्याकरिता जोमाने कामाला लागा: विष्णू पाटील

दै.रायगड नगरी । पेण

आगामी नगरपालिका, नगरपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या निवडणुकीकरिता जोमाने कामाला लागा. गोरगरीब सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडवा. संघटना मजबूत करून रायगडावर भगवा फडकवून शिवसेनाप्रमुख बाळासाहेबांचे स्वप्न पूर्ण करू या असे आवाहन माजी जिल्हाप्रमुख विष्णु पाटील यांनी पेण येथील आगरी विकास मंच येथे आयोजित शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत केले.

यावेळी शिवसेना पेण तालुक्याच्या वतीने शिवसंपर्क अभियाना अंतर्गत प्रवेश केलेल्या व्यक्तींचा पेण तालुका शिवसेनेतर्फे सत्कार करण्यात आला. माजी जिल्हाप्रमुख विष्णू पाटील, माजी उपजिल्हा प्रमुख अनंत पाटील, उद्धव कुथे, स्वरूप घोसाळकर, सुनिल मोदी, निळकंठ ठाकुर, रमेश पाटील, मधुकर पारधी, संतोष अडसुळे, राजेश गोरे, सुर्यकांत पवार, प्रिती कुथे, प्रगती मोरे, सपना पांढरे, सुलताना मांढरेसह बेणसे ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच व सदस्यांचा याप्रसंगी जाहीर सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्र शासनाच्या लोकोपयोगी विविध योजना सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवा. त्याचा लाभ गोरगरिबांना मिळवून द्या. अशी सामाजिक कामे करून जनसामान्यांमध्ये पक्षाची प्रतिमा अधिक उंच करा. सामान्यांचे प्रश्न सोडवल्याने मतांचे दान हे शिवसेनेच्याच पदरात पडणार असे विष्णु पाटील यांनी या वेळी सांगितले.

शिवसेनेत सर्वांना सन्मानाची वागणूक दिली जाते. शिवसेना एक कुटुंब आहे. या कुटुंबात आपले स्वागत आहे असे उदगार शिवसेना उपजिल्हाप्रमुख नरेश गावंड यांनी या सत्कार समारंभात काढले. या वेळी शिवसेनेचे माजी जिल्हा प्रमुख विष्णु पाटील, उपजिल्हाप्रमुख नरेश गावंड, तालुका प्रमुख अविनाश म्हात्रे, विधानसभा संघटक बाळा म्हात्रे, शिक्षक सेनेचे रवींद्र पाटील, महिला आघाडीच्या दीपश्री पोटफोडे, उपतालुका प्रमुख भगवान पाटील, संतोष पाटील, जयराज तांडेल, शहर प्रमुख सुधाकर म्हात्रे, रशाद मुजावर, शैलेश पाटील, सादुराम मालुसरे, जिल्हाध्यक्ष वहातुक दिलीप पाटील, जगदिश ठाकुर, नरेश सोनावणे, तुकाराम म्हात्रे, सु.दा.भोये, दर्शना जवके, राजश्री घरत, चेतन मोकल, अच्युत पाटील, प्रसाद देशमुख, श्रीतेज कदम, विजय पाटील, विशाल दोशीओंकार दानवे, विभागप्रमुख, युवासेना पदाधिकारी, ग्राहक कक्ष, वहातुक सेना, शिक्षक सेना, शिवकामगार सेना यांचे पदाधिकारी उपस्थित होते.

रायगड अं.नि.स.चा शासनाला सवाल...

डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या खूनामागील सूत्रधारांना केव्हा पकडणार?

दै.रायगड नगरी । पाली/बेणसे

२० ऑगस्ट २०२१ रोजी डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या निर्घृण खूनाला आठ वर्ष पूर्ण होत आहेत. या पार्श्वभूमीवर त्यांच्या खूनाच्या सूत्रधारांचे काय झाले? त्यांना कधी पकडणार? असा सवाल करत डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या खूनाच्या सूत्रधारांचा त्वरित तपास लावून कायदेशीर कारवाई करण्याची मागणी रायगड जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे रायगड जिल्हा अंनिसने आज केली आहे.

यावेळी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या खूनातील संशयित आरोपी म्हणून सीबीआयने २०१६ मध्ये डॉ. विरेंद्र तावडे, ऑगस्ट २०१८ मध्ये शरद कळसकर आणि सचिन अंदुरे आणि मे २०१९ मध्ये संजीव पुनाळेकर व विक्रम भावे यांना अटक करून आरोपपत्र दाखल केलेले आहे. तर अमोल काळे या संशयित आरोपीविरूद्ध सीबीआयने अजूनही आरोपपत्र दाखल केलेले नाही. तसेच अमित डिगवेकर व राजेश बंगेरा या संशयित आरोपीविरूद्धही सीबीआयने अजूनही आरोपपत्र दाखलच करण्यात आलेले नाही. या खूनाचा तपास डॉ. विरेंद्र तावडे व अमोल काळे यांच्या नावापर्यंत थांबलेला आहे. या खूनामागील सूत्रधार कोण हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. त्यामुळे पुढील तपास होऊन डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या खूनामागील सूत्रधार कोण आहेत हे सीबीआयने शोधून काढले पाहिजे. अन्यथा देशातील विवेकवादी विचारवंत, कार्यकर्ते, पत्रकार यांच्या अभिव्यक्तीला असलेला धोका संपणार नाही.यासाठी डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या खूनामागील सूत्रधारांचा त्वरित तपास लावून कायदेशीर कारवाई करणे आवश्यक आहे. या वेळी अंनिसच्या कार्यकर्त्यांच्या मागण्या जिल्हाधिकाऱ्यांनी शासनापर्यंत पोहोचवाव्यात अशी अपेक्षा व्यक्त केली.

यावेळी अंनिस रायगडचे जिल्हाध्यक्ष विवेक सुभेकर, जिल्हा कार्याध्यक्ष मोहन भोईर, जिल्हा प्रधान सचिव संदेश गायकवाड, जातीअंत विभाग राज्य सदस्य निलेश घरत, महिला विभाग राज्य सदस्य मीना मोरे, मंदाकिनी गायकवाड, श्वेता सुभेकर हे कार्यकर्ते उपस्थित होते.



श्रीकृष्ण जयंती, गणपती सारखे सण जवळ येताच अलिबाग, मुरुडमध्ये ढोलकीवाले दाखल झाले आहेत. (छाया : नितीन शेडगे, मुरुड)